# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२ ०६०१, २२६९ ०६०२, २२६४ ११५०/५१, फॅक्स - २२६९ २१०२.
तार - EDUTECH E-Mail: desk10@dte.org.in Internet: http://www.dte.org.in


क्रमांक :१०/एनजीपी/२००९/प्रमाणपत्रे/२३४
दिनांक :२६/०६/२००९

**विषय : शैक्षणिक वर्ष २००९-१० मधील व्यावसायिक पदविका अभ्यासक्रमांच्या राखीव जागांवर प्रवेश घेण्यासाठी आवश्यक असलेली प्रमाणपत्रे प्राप्त करुन घेण्याबाबत**

व्यावसायिक पदविका अभ्यासक्रमांच्या राखीव जागांवर प्रवेश घेणाऱ्या पात्र मागासवर्गीय उमेदवारांनी इयत्ता १० व १२ वी नंतर शासकीय, अशासकीय अनुदानीत व विनाअनुदानीत अभियांत्रिकी, औषध निर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट इ. पदविका अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचा प्रवेश अर्ज सादर करतेवेळी शासन नियमानुसार विहित नमुन्यातील प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.

त्याअनुषंगाने शैक्षणिक वर्ष २००९-२०१० मध्ये इयत्ता १० वी व १२ वी नंतर शासकीय, अशासकीय अनुदानीत व विनाअनुदानीत अभियांत्रिकी , औषध निर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट इ. पदविका अभ्यासक्रमांस प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या सर्व मागासवर्गीय उमेदवारांना सूचित करण्यात येते की, त्यांनी खालीलप्रमाणे संबंधित अभ्यासक्रमासाठी आवश्यक प्रमाणपत्रे प्राप्त करुन घ्यावीत. संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश अर्जाच्या स्वीकृतीच्यावेळी जर आवश्यक प्रमाणपत्रे संबंधित उमेदवार सादर करु शकला नाही, तर त्यास संबंधित प्रवर्गाच्या आरक्षणाचा फायदा मिळणार नाही व त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील, याची नोंद घ्यावी.

| अ. क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | मागासवर्गीय प्रवर्ग | **आवश्यक असलेली मूळ प्रमाणपत्रे** | |
|---|---|---|---|---|
| | | | **जात प्रमाणपत्र** | **नॉन-क्रिमी लेअर प्रमाणपत्र** |
| १ | अभियांत्रिकी , औषध निर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट इ. पदविका | SC, ST | **आवश्यक** | लागू नाही |
| | | VJDT/NT(A), NT(B), NT(C), NT(D), OBC, SBC | **आवश्यक** | **आवश्यक** |

● <u>जात प्रमाणपत्र (Caste Certificate) :</u> महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी सदर जात महाराष्ट्र शासनाच्या मागासवर्गीयांच्या अधिकृत यादीमध्ये मोडत असल्याचे संबंधित विद्यार्थ्याच्या नांवे दिलेले जात प्रमाणपत्र आवश्यक आहे.

● <u>जात वैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate) :</u> **महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी संबंधित विद्यार्थ्याच्या नावे दिलेले जात वैधता प्रमाणपत्र. शिष्यवृती/ फ्री शिप इ. सवलती मंजूरीसाठी संबंधीत विभागाने मागणी केल्यास पूर्तता करणे बंधनकारक राहिल.**

● <u>नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र :</u> **महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.सीबीसी १०/२००६/प्र.क्र.१५/मावक५, दि.०५/०६/२००६ अन्वये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व्यतिरिक्त** VJ/DT(A)/NT(B)/NT(C) /NT(D)/OBC/SBC **या सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांना प्रगत व उन्नत गटाचे (नॉन क्रिमी लेअरचे) तत्व लागू केलेले आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या संबंधित प्राधिकाऱ्यांनी दिलेले** दि. ३१/०३/२०१० पर्यंत **वैधता असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र** (Non-Creamy Layer Certificate) **असणे आवश्यक आहे.**

<u>उपरोक्त आवश्यक ती प्रमाणपत्रे उमेदवार/पालकांनी **दि.३० जून २००९** पर्यन्त तयार ठेवावीत. सदर प्रमाणपत्रापैकी **जर एखादे प्रमाणपत्र नसेल तर संबंधित उमेदवार त्याबाबतच्या सवलतीस पात्र ठरणार नाही, सदर प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी केलेल्या अर्जाची रिसीप्ट/ पावती ग्राहय धरण्यात येणार नाही** याची नोंद घ्यावी.</u>

**तसेच शैक्षणिक वर्ष २००९-१० मध्ये व्यावसायिक पदविका अभ्यासक्रमांस** प्रवेश घेणाऱ्या सर्व उमेदवारांना **भारतीय नागरीकत्वाचे प्रमाणपत्र (Indian Nationality Certificate) सादर करणे** बंधनकारक आहे. **नागरिकत्वाच्या पुराव्यासाठी जन्मप्रमाणपत्र किंवा पासपोर्ट किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये जन्मगाव किंवा नागरिकत्वाच्या रकान्यामध्ये तशी नोंद असणे आवश्यक आहे.**

**प्रवेशाबाबतची इतर सर्व माहिती , नियम या संचालनालयाच्या <u>www.dte.org.in</u> या संकेतस्थळावर उपलब्ध आहे तसेच माहितीपुस्तकातही दिलेली आहे.**

SKMahajan

( **डॉ. सु. का. महाजन** )
प्र.संचालक,तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई